गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक २३ वा ● रविवार ०९ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 23 | Date : 09/06/2024 blow Sunday Page 4 Price 4

# आज रालोआचा शपथविधी

## मंत्रिमंडळात पहिल्या टप्प्यात 30 जणांच्या समावेशाची शक्यता



नवी दिल्ली : राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा शपथविधी सोहळा रविवारी संध्याकाळी ७.१५ वाजता राष्ट्रपती भवनामध्ये होत आहे. गृह, अर्थ, संरक्षण, परराष्ट्र संबंध, रस्तेविकास, माहिती-तंत्रज्ञान, रेल्वे आणि शिक्षण ही महत्त्वाची खाती भाजपकडे राहतील. मोदींसह भाजप व घटक पक्षांतील ३० जण मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

जनता दल व तेलुगु देसम या दोन्ही प्रमुख घटक पक्षांना अनुक्रमे किमान २ आणि ४ केंद्रीय मंत्रिपदे दिली जाऊ शकतील. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, जनता दल (ध), राष्ट्रीय लोकदल, लोकजनशक्ती पक्ष, अपना दल, हिंदुस्तान अवामी मोर्चा, जनसेना, रिपब्लिकन पक्ष या घटक पक्षांनाही स्थान दिले जाईल.

यापैकी अनेक पक्षांनी किमान दोन मंत्रिपदाची मागणी केली असली तरी, मंत्रिमंडळाच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येकी एक मंत्रिपद दिले जाईल असे समजते. दरम्यान, शपथविधीचे काँग्रेस नेत्यांना अद्याप आमंत्रण मिळाले नसल्याचे पक्षाचे नेते जयराम रमेश यांनी स्पष्ट केले.

भाजपचे नेते राजनाथ सिंह, अमित शहा, निर्मला सीतारामन व एस. जयशंकर, नितीन गडकरी, पीयूष गोयल, अश्विनी वैष्णव, भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान, मनसुख मंडाविया, सर्बानंद सोनोवाल, किरेन रिजिजू, बिप्लब देब, गजेंद्र सिंह शेखावत, ज्योतिरादित्य शिंदे, प्रल्हाद जोशी आदींची केंद्रीय मंत्रिपदे कायम राहू शकतील.मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, संजय जयस्वाल, राजीव प्रताप रुडी, जितीन प्रसाद, संजय बंडी, केरळमध्ये भाजपचे खाते उघडणारे थिसूरचे सुरेश गोपी, जितेंद्र सिंह या नेत्यांनाही मंत्रिमंडळात स्थान दिले जाऊ शकते.महाराष्ट्रातून शिंदे गटाचे प्रतापराव जाधव, पवार गटाचे प्रफुल पटेल यांना मंत्री केले जाऊ शकते.

भाजपमधून नारायण राणे व उदयनराजे भोसले व रिपब्लिकन पक्षातून रामदास आठवले यांच्या नावाचाही विचार केला जाऊ शकतो.घटक पक्षांमध्ये एच. डी. कुमारस्वामी (जनता दल-ध), अनुप्रिया पटेल (अपना दल), जयंत चौधरी (आरएलडी), चिराग पासवान (एलजेपी), जितन मांझी (एचएपी), ललन सिंह व रामनाथ ठाकूर (जनता दल संयु), राममोहन नायडू, हरीश बालयोगी व दग्गुमाला प्रसाद (तेलुगु देसम) आदींचा समावेश केला जाणार असल्याचे समजते.

# राज्यात पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा; कोकण, मध्य महाराष्ट्राला मुसळधारांचा अंदाज

पुणे : नैर्ऋत्य मोसमी वारे शनिवारी सकाळी किंचित पुढे सरकत बारामतीत पोहोचले असून, पुढील २४ तासांत पुण्यात, तर ४८ तासांत मुंबईत येण्याची शक्यता आहे. रविवारपासून (९ जून) मोसमी वारे राज्यात प्रचंड गती घेणार असून आगामी पाच दिवस राज्याला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी कोकण, मध्य महाराष्ट्राला मुसळधारांचा लाल इशारा देण्यात आला आहे. मोसमी वाऱ्यांचे राज्यात ६ जून रोजी आगमन झाले. पण ते रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा या शहरांत दाखल झाले. त्यामुळे पुढील २४ तासांत हे वारे पुणे, मुंबई शहरात दाखल होईल, असा अंदाज होता. मात्र हवेचा दाब अनुकूल नसल्याने ते अडखळत पुढे जात आहे. त्यामुळे २४ तासांनी मोसमी वारे शनिवारी सकाळी किंचित पुढे सरकले आणि पुणे जिल्ह्यातील बारामतीत दाखल झाले. त्यामुळे त्या भागात पाऊस सुरू झाला आहे. आगामी २४ तासांत ते पुणे शहरात, तर पुढील ४८ तासांत मुंबईत दाखल होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, महाराष्ट्र ते अग्नेय अरबी समुद्रापर्यंत । पान २ वर



# राहुल यांना विरोधी पक्षनेते होण्यासाठी आग्रह

## काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी सोनिया गांधी



नवी दिल्ली : लोकसभेत दहा वर्षांनंतर विरोधी पक्षनेत्याची निवड केली जाणार असून हे पद राहुल गांधींनी स्वीकारावे अशी जोरदार मागणी शनिवारी झालेल्या काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत करण्यात आली. या प्रस्तावाचा विचार करून निर्णय घेऊ, असे राहुल गांधींनी नेत्यांना सांगितल्याचे समजते. २०१४ व २०१९ मध्ये काँग्रेस हा विरोधी पक्षांतील मोठा पक्ष असला तरी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते पदासाठी । पान २ वर

# सोलापुरात जड वाहतुकीने घेतला दुचाकीस्वाराचा बळी

**सोलापूर/प्रतिनिधी**

मृत नातलगाच्या तिसऱ्या दिवशी माती सावडण्यासाठी स्मशानभूमीकडे जाताना भल्या सकाळी जडवाहतुकीने एका दुचाकीस्वाराचा बळी घेतला पत्नीच्या डोळ्यांदेखत पती सिमेंटवाहू बल्करसारख्या जड वाहनाखाली चेंगरला आणि त्याच्या शरीराचे अक्षरशः दोन तुकडे झाले. ही थरकाप उडविणारी दुर्घटना शहरात अक्कलकोट रोड शांती चौकात हिंदू स्मशानभूमीजवळ घडली.सुनील शिवाजी पवार (वय ४२, रा. स्वागत नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे या दुर्घटनेतील मृताचे नाव आहे. यात त्याची पत्नी बालंबाल बचावली तरी तिच्या नशिबी वैधव्य आले आहे. याप्रकरणी बलकर चालकाविरूध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सोलापूर शहरात दिवसभर जड वाहतुकीला । पान २ वर

# दुधनी बंजारा समाजातील १८० लोकांनी एकत्रीत पाच हजार किलोमीटरचा प्रवास

**दुधनी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी शिवाजी नगर तांडा, गांधी नगर तांडा व म्हेत्रे नगर तांडा १ व २ असे मिळून १८० लोकांनी एकत्रीत एका वेळेत सुमारे पाच हजार कि.मि.प्रवास करून एक रेकार्ड केली आहे. दुधनी ग्रामीण येथील चार तांड्यातील सर्व १८० लोक एकत्रीत होऊन न भूतो न भविष्यती असा पोहरादेवी, काशी अयोध्या मथुरा,प्रयाग राज ओंकारेश्वर आग्रा उज्जैन त्र्यंबकेश्वर व शिर्डी अशा अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या व दर्शन पंधरा दिवसांत पाच हजार किलोमीटरचा प्रवास सुखकर पणे यशस्वी झाले, पहिल्यांदा इतके लोक घेऊन प्रवास बंजारा समाजात घडले असे सर्वत्र चर्चा होत आहे याचे नेतृत्व मोरया कन्स्ट्रक्शनचे चेअरमन अशोक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली व पोमू राठोड सर, लोकेश राठोड, अविनाश राठोड,रामू चव्हाण हुसेन जाधव उमेश मुकिंद राठोड, सुनील राठोड शिवाजी चव्हाण भिमा राठोड शिवा राठोड राजू पवार बंटी पवार दिलीप राठोड यांचे नियोजनबद्ध हा प्रवास सुखकर व यशस्वीपणे पार पडले, प्रवासात अन्नदान म्हणून अनेक दानशूर व्यक्ती अन्नदान केले यासाठी गोविंद राठोड कांतु चव्हाण संतोष राठोड व आकाश राठोड परिश्रम घेतले शेवटी पोमू राठोड यांनी प्रवास सुखकर व यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# 'नीट' परीक्षेतील गैरप्रकार; वाढीव गुणांच्या पुनर्मूल्यांकनासाठी समिति

**उच्चस्तरीय समिती १५०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या निकालाचे पुनर्मूल्यांकन करेल. पुढील आठवड्यात ही समिती आपल्या शिफारसी सादर करेल आणि विद्यार्थ्यांचे निकाल सुधारले जातील. वाढीव गुण देण्यामुळे परीक्षेच्या पात्रता निकषांवर परिणाम झालेला नाही आणि प्रभाविक उमेदवारांच्या निकालांच्या पुनर्मूल्यांकनाचा प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होणार नाही.**


**–सुबोध कुमार सिंह, महासंचालक, 'एनटीए'**

नवी दिल्ली : वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षेमध्ये (नीट) काही विद्यार्थ्यांना दिलेल्या वाढीव गुणांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभागाने चार सदस्यीय समिती स्थापन केली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) १५०० हून अधिक विद्यार्थ्यांना वाढीव (ग्रेस) गुण दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. । पान २ वर

# एकाचवेळी ४ सरकारी नोकरी परीक्षा उत्तीर्ण

## जिद्द, चिकाटीच्या बळावर प्रणाली माळी बनली सहाय्यक कनिष्ठ अभियंता

**सोलापूर/दैनिक यश सिध्दी न्यूज**



मनाचा ठाम निश्चय,अंगी जिद्द, चिकाटी व अभ्यासात सातत्य असले,तर कुठलीही गोष्ट शक्य होऊ शकते. हे निंबोणी (ता. मंगळवेढा)येथील सामान्य कुटुंबातील प्रणाली नरसप्पा माळी या तरुणीने सिद्ध केले आहे. ती महाराष्ट्र सरकार तर्फे घेण्यात येणाऱ्या सरळ सेवा परीक्षेतून ती चार महिन्यापूर्वी उपविभागीय भुमिअभिलेख मंगळवेढा येथे कनिष्ठ लिपिक/भूकरमापक पदावर सध्या कार्यरत आहे.

तसेच सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथे ओबीसी प्रवर्गातून प्रथम क्रमांकाने सहाय्यक कनिष्ठ अभियंता, सोलापूर जिल्हा परिषद सोलापूर येथे ओबीसी प्रवर्गातून तृतीय क्रमांकाने सहाय्यक कनिष्ठ अभियंता, जलसंपदा विभाग सातारा येथे

**"स्पर्धा परीक्षेचा अभ्यास नीट समजून घेत, वेळेचे नियोजन केले. आठ ते दहा तास अभ्यास करण्याची तयारी ठेवली. माझ्या यशामध्ये माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य व शिक्षकांचा मोठा वाटा आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी जिद्द, सातत्य, चिकाटी व प्रयत्न गरजेचे असते."– प्रणाली माळी**

सहाय्यक कनिष्ठ अभियंता पदी निवड झालेली आहे.प्रणालीला खाजगी कंपनीत नोकरीची संधी मिळत होती,पण शिक्षण आणि अभ्यासाची आवड असल्याने तिने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारीपद मिळवून समाजसेवेचा संकल्प केला.जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर एकाच वेळी सरकारी नोकरीच्या चार परीक्षा उत्तीर्ण होत घवघवीत यश मिळवले.

तिचे पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण जि.प.माळी वस्ती शाळा,निंबोणी येथे झाले. पाचवी ते दहावीचे शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल,निंबोणी येथे झाले. दहावीनंतर शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन,तासगाव येथे सिव्हिल इंजिनिअरिंग पूर्ण केले. बी.टेक सिव्हिल शिवाजी युनिव्हर्सिटी,कोल्हापूर येथून प्रथम श्रेणी मधून उत्तीर्ण झाली.



# हजरत पीर ख्वाजा दाऊद चीस्ती रह. दर्गा यांचा उरुस प्रारंभ

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट शहरातील अक्कलकोटचे ग्रामदैवत हिंदू-मुस्लिम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत पीर ख्वाजा दाऊद चीस्ती रह. दर्गा यांचा ८४५ वा उर्स १० जुन सोमवार पासून सुरुवात होणार आहे.दिनांक: १० जुन सोमवार रोजी संदल गंध, दिनांक ११ जुन मंगळवार दिवशी उर्स(चिराका) जत्रा, दिनांक:१३ जुन बुधवार रोजी ज्यारत व प्रसाद वाटप चा कार्यक्रम असणार आहे व १२ जुन बुधवार रोजी रात्री १०:०० वाजता ह.सय्यद मीर आलम नवाज शहा कादरी कलाम भजन, दाता बलोरगी ग्रुप अक्कलकोट चा आयोजन केला आहे.दर्गा प्रमुख:अलहाज हाजी नसरुद्दीन इ. मुतवली व दर्गा कमिटी कडून जास्तीत जास्त भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान केले आहे.

# सोलापुरात वीज कोसळून दोघांचा मृत्यू; तिसरा गंभीर जखमी

## दोन कारखान्यांचेही नुकसान

**सोलापूर/प्रतिनिधी** : मृग नक्षत्राच्या पहिल्याच पावसाने सोलापूर जिल्ह्यात दाणादाण उडवत दमदार हजेरी लावत असतानाच वीज कोसळण्याच्या पाच घटना घडल्या. यात दोन वृद्धांचा मृत्यू झाला. तर अन्य एक वृद्ध शेतमजूर गंभीर भाजून जखमी झाला. अन्य दोन घटनांमध्ये दोन कारखान्यांवर वीज कोसळून लाखोंचे नुकसान झाले.दुसरीकडे या दमदार पावसामुळे जिल्ह्यातील दुष्काळ दूर होण्याच्या आशा पल्लवित झाल्या असून सांगोला व मंगळवेढ्यासारख्या भागात पावसाचा जोर दिसून येतो. या पावसामुळे सांगोला तालुक्यातील एरव्ही कोरडी ठणठणीत राहणारी कोरडा नदीला पाणी आले आहे. ओढे-नालेही भरून वाहू लागले आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुर्देहळ्ळी गावच्या शिवारात शेतात शेळ्या राखताना अंगावर वीज कोसळल्याने आमसिध्द अमृत गायकवाड (वय ६४) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या दोन शेळ्याही मृत्युमुखी पडल्या. दुसरीकडे याच दक्षिण सोलापूर तालुक्यात वळसंग येथून दुचाकीवर बसून कुंभारीत घराकडे परत निघालेले बिळेणी नागप्पा डचके (वय ४८) हे वाटेत विजेचा जोरदार कडकडाट होऊन जवळच वीज कोसळली. तेव्हा डोळे दिपून घाबरलेले डचके हे चालत्या दुचाकीवरून क्षणात तोल जाऊन खाली कोसळले आणि बेशुध्द झाले. त्यांना रूग्णालयात । पान २ वर

## संपादकीय

### त्याची नोंद घ्यावीच लागेल...

भाजपप्रणीत एनडीए आघाडीला निसटते बहुमत मिळाले असले तरी भाजपचे स्वबळाचे बहुमत गमावले गेले आहे. एनडीए आघाडीला जे काही बहुमत मिळाले आहे ते केवळ बोटावर मोजता येईल इतके तकलादू आहे. त्यातही नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू या दोन नेत्यांच्या तालावर या मोदी सरकारला पुढील काळात कसरत करावी लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तिगत करिष्म्यावर ही निवडणूक भाजपने लढवली होती. त्यांच्या आघाडीत संख्येने बरेच पक्ष असले तरी नाव घेता येईल असे केवळ तीन-चारच पक्ष त्यांच्याकडे होते. गेल्या दहा वर्षांच्या मोदींच्या राजवटीत दोन्ही वेळा मोदींच्या पक्षाकडे स्वबळावर बहुमत असल्याने त्यांनी कधीच एनडीएतील मित्र पक्षांची तमा बाळगली नव्हती किंवा त्यांना धोरणात्मक निर्णय घेताना फारशी किंमतही दिली नव्हती. पण आता मात्र मोदींना असे करून चालणार नाही. कारण चंद्राबाबू आणि नितीशकुमार या दोन दिग्गज नेत्यांना विश्वासात घेऊन किंवा त्यांना विचारूनच सरकारची पावले टाकावी लागणार आहेत. चंद्राबाबू आणि नितीशकुमार हे लोकशाही मानणारे आणि त्याची जपणूक व्हावी अशी मनस्वी इच्छा असणारे नेते आहेत. त्यामुळे यापुढील काळात आता केवळ मोदी एके मोदी असे चालणार नाही आणि अमित शहांना एकतर्फी मनमानी कारभार करता येणार नाही, असाही संदेश या निकालातून दिला गेला आहे. ही निवडणूक विरोधी पक्षांसाठी अत्यंत अवघड निवडणूक होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या गेल्या ७५ वर्षांच्या राजवटीत केंद्रातील कोणत्याही सरकारने विरोधकांची केवळ निवडणुकीच्या हेतूने इतकी गळचेपी केली नव्हती. काँग्रेससारख्या देशातल्या प्रमुख राजकीय पक्षाची सारी बँक खातीच निवडणूक काळात गोठवून त्यांना आर्थिकदृष्ट्या पूर्ण अपंग केले गेले. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या मंत्र्यांवर ईडी वगैरे यंत्रणांचा वरवंटा चालवून त्यांच्यावर दहशत बसवण्याचा प्रयत्न केला गेला. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूतील मंत्र्यांना अटक केली गेली. बाकी निवडणूक आयोगालाच बटिक बनवून आपल्याला हवा तसा निवडणूक कार्यक्रम बनवला गेला, विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या. याची कुठे दाद ना फिर्याद अशा असाहाय्य अवस्थेत विरोधकांनी विशेषत: काँग्रेस व इंडिया आघाडीच्या नेत्यांनी ही निवडणूक लढवली आहे. इंडिया आघाडी बहुमतापासून काहीशी दूर राहिली असली तरी त्यांनी अत्यंत लक्षणीय यश मिळवले आहे त्याची नोंद घ्यावीच लागेल.

पान १ वरुन

### राहुल यांना विरोधी पक्षनेते..

किमान दहा टक्के जागा म्हणजे ५५ जागा पक्षाने जिंकल्या नव्हत्या. त्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेते पद दिले गेले नव्हते. आता मात्र, सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसला मिळू शकेल.

बैठकीमध्ये राहुल गांधींनी विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी स्वीकारावी असा ठराव संमत करण्यात आल्याची माहिती संघटना महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितले. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. शिवकुमार यांनी राहुल गांधींसंदर्भातील प्रस्ताव मांडला व शशी थरूर यांनी अनुमोदन दिले. प्रामुख्याने पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह राहुल गांधी व प्रियंका गांधी-वाड्रा यांनी प्रचार केला होता. यावेळी काँग्रेसच्या यश मिळाले आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनीच विरोधी पक्षनेते झाले पाहिजे, असे मत शिवकुमार व थरूर यांनी व्यक्त केले.

राहुल गांधी उत्तर प्रदेशातील रायबरेली व केरळमधील वायनाड या दोन्ही लोकसभा मतदारसंघांतून विजयी झाले आहेत. मात्र, या दोनपैकी एक जागा त्यांना सोडावी लागेल. त्याबाबत लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर १४ दिवसांमध्ये निर्णय घ्यावा लागेल. त्यामुळे १७ जूनपर्यंत राहुल गांधी रायबरेली की वायनाडचे खासदार राहतील हे स्पष्ट होईल. पुढील दोन वर्षांनी केरळमध्ये विधानसभा निवडूक होणार असल्याने राहुल गांधींनी वायनाडच्या खासदारकीचा राजीनामा देऊ नये, असा मतप्रवाह काँग्रेसमध्ये आहे तर, रायबरेली हा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ असून तिथून राजीनामा दिल्यास चुकीचे संदेश दिला जाईल असेही मानले जात आहे.

### सोलापुरात जड वाहतुकीने घेतला ..

कायदेशीर बंदी आहे. मात्र तरीही कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे जड वाहतूक राजरोसपणे सुरू असते. सुनील पवार यांच्या मृत्यू झालेल्या एका नातलगाच्या तिसर्या दिवशी माती सावडण्यासाठी सुनील पवार हे आपल्या पत्नीसह दुचाकीवर बसून घराकडून अक्कलकोडरस्त्यावरील शांती चौकाजवळ हिंदू स्मशानभूमीकडे निघाले होते. स्मशानभूमीच्या जवळ पोहोचले असतानाच त्यांना एका बलकरने ठोकरले.जोरात धक्का बसल्याने पवार दाम्पत्य दुचाकीवरून बाजूला फेकले गेले. मागील चाकाखाली सुनील पवार हे चेंगरून जागीच मृत्युमुखी पडले. तर पत्नी दुसरीकडे बाहेर फेकली गेल्याने थोडक्यात बचावली. मात्र तिच्या डोळ्यांदेखत पतीच्या शरीराचे अक्षरशः दोन तुकडे होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत सुनील पवार हे मूळचे तुळजापूर तालुक्यातील राहणारे असून रोजगारासाठी ते सोलापुरात सासरी राहात होते.

# शैक्षणिक अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करने कितपत योग्य आहे ?

## ५० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

**छत्रपती संभाजी नगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

समाज जीवनात कार्यरत बुद्ध फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना फुले शाहू आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. सोबतच वर्तमानकाळात काही विपरीत घडतय काय? याकडे लक्ष दिले तर आपल्या लक्षात येईल की, सध्या अभ्यासक्रमात मनाचे श्र्लोक, भगवद्गीता व मनुस्मृतीचा समावेश करण्याच्या अनुषंगाने अभ्यासक्रम मंडळाने आक्षेप मागविले आहेत. म्हणून मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश करने कितपत योग्य आहे? या ज्वलंत विषयावर २ जून २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, पक्ष, संघटना, संस्था नेमकेपणाने काय करीत आहेत? आपली काय भूमिका काय असावी? याची जाणीव होऊ शकेल.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सत्येंद्र तेलतुंबडे म्हणाले की, त्यांना चार चाकी गाडी घ्यायची होती. पण नवीन गाडी घेणे आवाक्याबाहेर असल्याने जुनी गाडी घ्यावी असे ठरले. त्यामुळे जुनी गाडी विक्रेत्यांकडे गेल्यावर ती गाडी एखाद्या मेकॅनिक ला दाखवावे म्हणून गाडी चालविता येत नसल्याने गाडी मालका सोबत मेकॅनिक च्या गॅरेज ला गेले. तेव्हा त्यांनी हॉर्न सोडून सर्व पार्टस वाजतात, असे मत व्यक्त केले होते. तशीच स्थिती आपल्या चळवळीची झाली आहे. आपण ज्यांना आदर्श मानतो नेमके आमच्या कार्यात त्या आदर्श महापुरुषांचे तत्त्वज्ञानच नसते. ज्ञान कशाला म्हणतात? हे गाडगेबाबा कडून शिकले पाहिजे. तर मनू मताला शूद्र जाळतील असे फुले म्हणाले होते. परंतु शूद्रांनी ती जाळली नाही मात्र अतिशूद्रांनी ती जाळली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका असा संदेश देताना कलम २१ प्रमाणे मोफत व शक्तीचे शिक्षण दिले पाहिजे, अशी तरतूद केली. आपली शिक्षण व्यवस्था चार्वाकांनी निर्माण केली, ज्यात शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा ड्रेस कोड एकसारखाच होता. हे समतेचे द्योतक आहे. वर्तमानात जास्त श्रम करणा-याला कमी पगार मिळतो तर कमी श्रम करणा-याला जास्त पगार मिळतो. तर मग समतामूलक समाज कसा स्थापित होईल? शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक प्रगल्भ नसल्याने नवनिर्मितीला वाव उरला नाही. करिता शिक्षण व्यवस्थेला छेद दिला पाहिजे. मनुचे नांव येईपर्यंत आपण गाढ झोपेत होतो. बुद्धाचे पंचशील नष्ट करण्यासाठी भगवद्गीता लिहिण्यात आली आहे. मनू आपल्या मनात रुजलेला आहे, ज्याला उखडून फेकू शकलो नाही. अनेक आशीर्वाद गाथेत नांव नव-याचे, पोरं सोय-याचे अशी अवस्था आहे.

याप्रसंगी महादेव डांबरे म्हणाले की, प्रदीप गोखले यांनी 'विषमतेचा पुरस्कर्ता' मनू हे पुस्तक लिहून मनुचे कारनामे उघड केले आहेत. एक पुस्तक प्रेमी माणूस मनुस्मृती जाळतो म्हणजे ती किती भयानक असेल. मनुस्मृती ही शेणातील शेंगदाण्यासारखी आहे. एड. विलास रामटेके म्हणाले की, मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश होने अयोग्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ ला एक मनुप्रणित कायद्याचे पुस्तक जाळून पुढे दुसरे कायद्याचे पुस्तक लिहिले आहे. जातीव्यवस्थेमुळे बहुसंख्यांक हे अल्पसंख्याक झाले. राहूल मेश्राम म्हणाले की, मनू म्हणजे विषमतावादी विचार येणे, हे धोकादायकच आहे. डॉ. आर. डी. बडगे म्हणाले की, आपण जागृत आहोत किंवा नाही हे तपासण्यासाठी त्यांनी खडा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. किमान समान कृती कार्यक्रम ठरवून आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. संघदीप रोडगे म्हणाले की, मानवी मेंदू ला जागृत केल्यामुळे सत्य असत्याची जाणीव होते. शिकलेल्या लोकांना एकत्रित आणणे शक्य होत नाही. करिता मान्यवर कांशीराम, डी. के. खापर्डे यांनी अधिकारी पदाच्या नौक-या सोडल्या. शिक्षणाचा अर्थ केवळ पोट भरणे एवढाच नाही. बाबासाहेब केवळ सोयीनुसार सांगून चालणार नाही. ओबीसींना विनाअट संघटनेत समाविष्ट करावे. साधू आनंद म्हणाले की, एलपीजी चा प्रभाव थांबविता आला असता तर ही वेळ आपणांवर आली नसती. एड. प्रविण जाधव म्हणाले की, जी मनुस्मृती देशातील सामान्य माणसापर्यंत लिखित स्वरूपात पोहोचली नाही तिचा आजच समावेश करण्याची आवश्यकता का भासली आहे? सचिन निकम म्हणाले की, आपल्या विविध पक्ष संघटनांकडे किमान दहा बाय दहा चे कार्यालय नसावे ही आपली दुरावस्था आहे. ज्याला या स्टडी सर्कल च्या माध्यमातून साकार करण्याचा प्रयत्न करण्यात आला, हे महत्वपूर्ण आहे. जितेंद्र आव्हाड यांनी जाणीवपूर्वक म्हणा की अनवधानाने, ज्यामुळे या विषयाला व्यापकता आली. ब्राह्मणवादी मानसिकतेचे संचालक असणाऱ्या शिक्षण संस्थात पूर्वीपासूनच मनुस्मृती शिकविली जाते. त्यामुळे मनुस्मृतीचा शिरकाव केव्हाच झाला आहे. आयटीआय मध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे हा त्याचाच एक भाग आहे. मनुस्मृतीत नेमके काय आहे? याची जाणीव होणे आवश्यक आहे.

प्रमुख वक्ते एड. निलेश खडकीकर म्हणाले की, भारतात भौगोलिक रचना चांगली असून शांततापूर्ण वातावरण असल्याने आर्य बाहेरून भारतात आले, ज्यामुळे त्यांनी राज्य करण्यासाठी वेद, स्मृती, पुराणांची अंमलबजावणी केली. महिलांनी भ्रष्ट पुरुषांची सुद्धा सेवा केली पाहिजे, असा दंडक लावून मनुस्मृतीने महिलांना घटस्फोट नाकारला होता, तो मात्र भारताचे संविधानाने बहाल केला आहे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दैनंदिन जीवनात आपणाकडून अनुक्रमांक लिहित असताना इंग्रजीत नंबर ऐवजी थोडक्यात एनओ लिहिले जाते, ज्यात नंबर मध्ये ओ कुठे दिसत नाही. तर हा शब्द मुळात लॅटिन भाषेतील न्युमिरो आहे ज्यात ओ आहे. अशाप्रकारे आपणास आपल्या सर्व समस्यांचे मूळ शोधून ओ दिला पाहिजे करिता रचनात्मक कार्य करावे लागेल. अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा विरोध करण्यापेक्षा आंबेडकरवादाचा समावेश कसा केला जाऊ शकेल? यावर ऊर्जा लावली पाहिजे. रामजी बाबा कबीर पंथीय असल्याने हिंदू धर्म ग्रंथात काय लिहिलेले आहे? ते माहीत पडण्यासाठी रामायण, महाभारत भीमरावांना वाचनासाठी उपलब्ध करून दिले जात होते. ब्राह्मणवाद केवळ भारतात नव्हे! तर जागतिक स्तरावर कार्यरत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आज एक बातमी आली ती अशी की, दक्षिण आफ्रिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांच्या पुढाकाराने १९९४ पासून अस्तित्वात असलेल्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेस चे सरकार अल्पमतात आले आहे. भारताचा इतिहास दुसरे तिसरे काही नसून बुद्धवाद व ब्राह्मणवादातील लढाई आहे. असे बाबासाहेब म्हणाले होते. करिता ब्राह्मणवादी त्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील असतात. आपण मात्र आपल्या आदर्श महापुरुषांच्या मूल्यांना समजून घेऊ शकलो नाही. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९२४ ला शिकवा (शिका), चेतवा (संघर्ष करा) आणि संघटीत व्हा. असा संदेश दिला असताना आंबेडकराईट संघटनांचे नेतृत्वातील अनेक जण मात्र 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.' असा संदेश देत असतात. परिणामी संघटीत होण्यासाठी संघर्ष करावा लागतो, हे ध्यानी मनी नसल्याने आपण संघटीत होण्यापासून कोसो दूर आहोत. या दूरगामी परिणामांची चिकित्सा केली पाहिजे. जेणेकरून मूळ संदेशाचे मर्म आपणास कळेल. १९ ऑक्टोबर १८८२ ला राष्ट्रपिता ज्योतिबा फुल्यांनी हंटर आयोगाला सादर केलेल्या निवेदनाप्रमाणे कनिष्ठ व वरिष्ठ शिक्षण प्रणाली कशी असावी? हे समजून घेतली पाहिजे. करिता अभ्यासक्रमात सीबीएसई, आयसीएसई, स्टेट बोर्ड, नवोदय असा भेदभाव न करता एक देश, एक पालिसी, एक अभ्यासक्रम देशभरात लागू करावा.

या कार्यशाळेला महादेव डांबरे, एड. निलेश खडकीकर, एड. विलास रामटेके, डॉ. आर. डी. बडगे, डॉ. जीतेंद्र पाँचगावकर, राहूल मेश्राम, सत्येंद्र तेलतुंबडे, सचिन निकम, संघदीप रोडगे, साधू आनंद, एड. प्रवीण जाधव, बी. बी. मेश्राम, सुष्मिता खडकीकर इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

### 'नीट' परीक्षेतील गैरप्रकार;

'नीट' परीक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसने शुक्रवारी केली होती. आम आदमी पक्षानेही या गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. या निकालामुळे राज्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप करत महाराष्ट्र सरकारने ही परीक्षा तात्काळ रद्द करण्याची मागणी केली, तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) या विद्यार्थी संघटनेने सीबीआय चौकशीची मागणी केली. राजकीय पक्ष व विविध संघटनांकडून होत असलेल्या आरोपानंतर शनिवारी केंद्रीय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या वाढीव गुणांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे, अशी माहिती 'एनटीए'चे महासंचालक सुबोध कुमार सिंह यांनी दिली.

### राज्यात पाच दिवस अतिवृष्टीचा..

द्रोणीय रेषा तयार झाली आहे. त्यामुळे राज्यातील हवेचा दाब ९ जूनपासून अनुकूल होत आहे. या स्थितीमुळे आगामी २४ तासांत पुणे, तर पुढच्या ४८ तासांत ते मुंबईत येण्याची शक्यता आहे. केरळ, तामिळनाडू भागात अतिवृष्टी सुरू झाली आहे. त्याचा परिणाम राज्यात दिसणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही ९ ते १३ जून दरम्यान मुसळधार ते अतिवृष्टी असा पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे ९ जून रोजी कोकण, मध्य महाराष्ट्राला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामध्ये घाटमाथ्यावर ९ जूनपासून पाऊस वाढणार आहे.

### सोलापुरात वीज कोसळून..

दाखल केले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले. वीज कोसळताना घाबरून हृदयक्रिया बंद पडून त्यांचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष वैद्यकीय अधिका-यांनी काढला. या दोन्ही घटनांची नोंद वळसंग पोलीस ठाण्यात झाली आहे.

वीज कोसळण्याची तिसरी घटना सोलापूर शहरानजीक दोड्डी (ता. दक्षिण सोलापूर) येथे घडली. शेतात पाऊस पडताना वीज कोसळली. यात शंकर राठोड (वय ६७) हे गंभीर भाजून जखमी झाले. त्यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दुसरीकडे शहरात अक्कलकौट रस्त्यावर कोंडानगर परिसरात एका टावेल शिलाई कारखान्याच्या गोदामावर वीज कोसळून त्यात लाखो रूपयांचे नुकसान झाले. सुरेश अंबुरे यांच्या मालकीच्या या कारखान्यातील टावेलच्या साठ्यासह यंत्रसामुग्री जळून गेली. करमाळा तालुक्यातील देवळाली येथेही सचिन अरूण कानगुडे यांच्या मालकीच्या टायर रिमोल्डींग कारखान्यावर वीज कोसळून त्यात मोठे नुकसान झाले.

एकुकडे वीज कोसळून जीवित आणि वित्तहानीच्या दुर्घटना घडत असताना दुसरीकडे जिल्ह्यातील दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर पडणा-या दमदार पावसामुळे सर्वांना दिलासा मिळाला आहे. सलग चौथ्या दिवशी पावसाची हजेरी लागत आहे. सांगोला तालुक्या त २६.५ मिलीमीटर तर मंगळवेढा तालुक्यात २२ मिमी पाऊस पडला. सलग पडणा-या या पावसामुळे सांगोल्यातील कोरडा नदीला पाणी आले आहे. एरव्ही ही नदी कोरडीच राहते. जिल्ह्यात आठवडाभरात सर्वाधिक १२०.९ मिमी पाऊस करमाळा तालुक्यात तर १०२.९ मिमी पाऊस मोहोळ तालुक्यात झाला आहे. बार्शी तालुक्यात केवळ ३७.७ मिमी पाऊस झाला असून खरीप हंगामात सोयाबीन लागवडीसाठी तयारुत असलेले तेथील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

## माढा तालुका पुरोगामी प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन व व्हा. चेअरमन निवडी खेळीमेळीत संपन्न



कुर्डूवाडी/प्रतिनिधी : पुरोगामी पतसंस्थेच्या कार्यालयात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ व कार्यकारिणीची सभा संपन्न झाली. या सभेत सर्वांमध्ये एकमताने हनुमंत मोतीलाल पिसाळ यांची पतसंस्थेच्या नूतन चेअरमन पदी निवड करण्यात आली.

तसेच व्हाईस चेअरमन पदी सुरेखा पाटील यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली.निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले. याप्रसंगी माढा विभागीय अध्यक्ष दिनकर शिंदे, माढा तालुका शिक्षक समितीचे तालुका अध्यक्ष कैलास काशीद, तालुका सरचिटणीस वामन गायकवाड पतसंस्थेचे जेष्ठ संचालक अशोक पाटील, विजयकुमार मुकणे, माधव गायकवाड, मावळते व्हाईस चेअरमन तात्यासाहेब राजगिरे, माजी व्हाईस चेअरमन अभिमन्यू काळभोर, मधुकर डोंगरे, तानाजी ढवळे, संचालक राजाभाऊ कदम,विठ्ठल गायकवाड, ज्ञानेश्र्वर चव्हाण, पतसंस्थेचे कर्तव्यदक्ष सचिव प्रशांत होवाळ सोमेश्र्वर कुंभार आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शिवपुत्र घटकांबळे यांचा पोलीस दलातून निवृत्त झाल्यानंतर अक्कलकोट येथे भव्य सत्कार



**नौपाडा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महार रेजिमेंट स्थापना केली ,व आपणास सैनिक बनवण्याचा बहुमान मिळाला अशा महा रेजिमेंटमध्ये २० वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाल्यानंतर ठाणे पोलीस जॉईन केले व पोलीस सारखी खडतर सेवा करून ही समाजकार्यात अग्रेसर व महा रेजिमेंट चे प्रश्न सोडवण्यात प्रयत्नशील असणारे कायद्याचे अभ्यासक सर्वांना सोबत घेऊन काम करणारे आदरणीय शिवपुत्र घटकांबळे साहेब ३१मे २०२४ रोजी १९ वर्षे पोलीस सेवा करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. जानेवारी १९८६ ला महारजिमेंटला भरती होऊन वीस वर्षे ८ महार रेजिमेंटमध्ये नोकरी करून सुरुवातीला भारतीय शांती सेनेच्या अंतर्गत श्रीलंका येथे कर्तव्य पार करून मेरठ, अरुणाचल प्रदेश ,फिरोजपुर ,परत अरुणा प्रदेश ,नंतर जयपूर ,परत जम्मू-काश्मीर सैन्यातील नोकरीच्या काळात भूसुरुंगाचे प्रशिक्षण म्हणून उत्कृष्ट काम केले. सन २००५ ठाणे शहर पोलीस दलात भरती होऊन नौपाडा पोलीस स्टेशन व कळवा पोलीस स्टेशननंतर शहर वाहतूक शाखा येथे नोकरी करून १९ वर्षे सेवा पूर्ण करून ३१ मे २०२४ ला सेवानिवृत्त झाले .

मेजर कमलाकर कांबळे साहेब (भारती बौद्ध महासभा जिल्हा उपाध्यक्ष) मा सिद्धाराम घटकांबळे( जिल्हा संघटक) शिरशल शिवशरण (ता कोशअध्यक्ष) व मित्र परिवारातर्फे माजी सैनिक शिवपुत्र घटकांबळे हे महाराष्ट्र पोलीस दलातून ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. याबद्दल त्यांचा अक्कलकोट शहरांमध्ये मानाचा फेटा बांधून व सुगंधी पुष्पहार अर्पण करून त्यांना व त्यांच्या पत्नीचा सत्कार करण्यात आला ,व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या .यावेळी भीमाशंकर घटकांबळे संपूर्ण परिवार बंटी बनसोडे (उद्योजक )नागू गवळी विकास कांबळे, प्रकाश पोटे ,सर्वजण उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सुरक्षित जीवनासाठी पर्यावरण जनजागृती आवश्यक : उपकुल सचिव डॉ. मलिक रोकडे

**पंढरपूर/प्रतिनिधी :**

वाढत्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणात नकारात्मक बदल होत आहेत. या बदलांचा मानवी जीवनावर व अस्तित्वावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे पर्यावरण विषयी जनजागृती व वृक्ष संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर वृक्षारोपण हा उपक्रम प्रत्यक्षात परिणामकारकपणे राबविणे अत्यंत गरजेचे आहे.' असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे उप-कुलसचिव डॉ. मलिक रोकडे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये पर्यावरण जनजागृती, वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण अभियानाची सुरुवात करण्यात आली. दि. ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिना' चे औचित्य साधून पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे उप-कुलसचिव डॉ. मलिक रोकडे यांच्या हस्ते स्वेरीमध्ये वृक्षारोपण करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. रोकडे हे वृक्ष लागवडीचे महत्व पटवून देत होते. स्वेरीमध्ये



शैक्षणिक कार्याबरोबरच समाज हितासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात हे सर्वश्रुत आहे. याचाच एक भाग म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या समन्वयातून विद्यापीठ अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती, वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण अभियान हे दि. ०५ जून पासून ते दि.०२ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांच्या परिसरात या अभियानाचा एक भाग म्हणून ''एक विद्यार्थी, एक वृक्ष' तसेच 'एक कर्मचारी, एक वृक्ष' या संकल्पना अतिशय प्रभावी पणे राबविण्यात येत आहेत. स्वेरीत शैक्षणिक कार्यक्रमासाठी आलेल्या विविध पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येते. आजपर्यंत स्वेरी ग्रीन टिम च्या माध्यमातून महाविद्यालय व परिसरामध्ये जवळपास १० हजार पेक्षा अधिक वृक्ष लागवड करण्यात आल्याची माहिती स्वेरी ग्रीन टीमचे समन्वयक प्रा. के.एस. पुकाळे यांनी दिली. यावेळी माजी नगरसेवक सुधीर धुमाळ, स्वेरीचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उल्हासनगर मध्ये होत आहे झाडांची कत्तल उल्हासनगर महानगरपालिकेचे दुर्लक्ष ?



**उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे**

उल्हासनगर महानगरपालिका एकीकडे पर्यावरण दिवस साजरा करून नागरिकांपर्यंत शासनाचे उपायोजना राबवत आहे आणि उल्हासनगर मध्ये सरासपणे झाडांची कत्तल होताना दिसत आहे.पर्यावरण विभागामार्फत राज्यभर वृक्ष संवर्धन करण्यासाठी राज्य शासन वेगवेगळ्या पध्दतीने पर्यावरण वाचवण्यासाठी जनजागृती करत आहे मात्र उल्हानगरमधील शहर हे शासनाच्या कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी करताना पाहायला मिळत नाही कारण असे बेरेक नंबर २३० रूम नंबर ९. उल्हासनगर २ याठिकाणी जमीनदोस्त झाडाची कत्तल करण्यात आली आहे याठिकाणी झाड तोडण्याची कोणतेही परवानगी नसून अधिकाऱ्यांना हाताशी धरून हे झाड तोडण्यात आले आहे अशी चर्चा सामाजिक कार्यकर्त्याने सांगितले आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त याठिकाणी काय कारवाई करणार आहेत. याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# मोडनिंब, लऊळ परिसरात पावसाने बांध फुटले

माढा/प्रतिनिधीः मोडनिंब आणि लऊळ परिसरातील गावांमध्ये गुरुवारी रात्री झालेल्या पावसामुळे अनेक शेताचे बांध फुटले तर मोडनिंब शहरालगत असलेल्या ओढ्यावरील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा फुटला तर खेळणी विक्री व्यवसाय करणाऱ्यांची खेळणी, खुर्च्या वाहून जाऊन लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. गुरुवारी रात्री मोडनिंब, लऊळ, भेंड, पडसाळी, व्होळे परिसरात दोन तासांत साधारणतः ५५.३ मिमी पावसाची नोंद झाली. गेले दोन दिवस या परिसरात पाऊस पडत होता. पडलेल्या पावसामुळे अनेक शेतातील बांध फुटले. त्याचे पाणी मोडनिंब शहराच्या लगतने वाहणाऱ्या ओढ्यात आल्याने येथील ओढ्याला पूर आला. या पुरात कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याला भगदाड पडल्याने पंधरा दिवसांपूर्वी यात्रेसाठी आलेल्या खेळणी विक्री व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले. जूनच्या पहिल्या आठवड्यामध्ये मोडनिंब मंडलात सरासरीच्या १२० टक्के पावसाची नोंद झाली. भेंड, अरण येथे झालेल्या पावसामुळे मोडनिंब ओढ्याची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात वाढली. वेताळबाबा मंदिर परिसराच्या मागील बाजूस कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला होता. जवळपास १५७ सहस्र घनमीटर साठवण क्षमता असलेला हा बंधारा मोडनिंब शहरातील विंधन विहिरींसाठी महत्त्वाचा स्रोत होता. बंधाऱ्याच्या लोखंडी दारातून वाहणारे पाणी जुने वृक्ष व गवतांनी बंद झाले. पाण्याचा दबाव वाढून एका बाजूला बंधाऱ्याला मोठे भगदाड पडले. सांगोला परिसरातील शहाजी बाबर व शिवाजी इंगोले या व्यवसायिकांची खेळण्याची दुकाने या पाण्यात वाहून गेली. झुलती नाव, ब्रेक डान्सच्या खुर्च्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या. यामध्ये या दोन व्यावसायिकांचे सुमारे आठ लाख रुपयांचे नुकसान झाले.

# आवकाळी पावसामुळे शेडनेटचे लाख रुपयाचे नुकसान शेतकरी हवालदिल शासनाकडून मदतीची अपेक्षा

**बुलढाणा/ राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ येथे शासनाच्या पोखरा योजनेअंतर्गत मंगरूळ येथील आठ ते दहा शेतकरी यांनी शेडनेट हाऊस ची पोखरा योजनेअंतर्गत शेडनेटचे उभारणी केली होती. आज शेती ही निसर्गाच्या भरोशावर परवडत नाही म्हणून काही शेतकरी आधुनिक शेती कडे वळले आहेत आणि काही शेतकरी आधुनिक शेती करण्याला सुरुवात केली आहे परंतु निसर्गाच्या आसमानी आणि सुलतानी संकटामुळे मंगरूळ येथील परमेश्र्वर सुरुशे योगेश बांडे संजय गवते दामोदर शिंदे प्रकाश गवते गजानन वरपे अनिल सुरुशे सखाराम सुरुशे व इतर काही शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे शेडमध्ये आलेला माल निसर्गाच्या वादळी पाऊस व वाऱ्यामुळे शेडनेटचे अतोनात नुकसान झाले आहे आज शेतकरी हा देशोधडीच्या मार्गावर आहे

परंतु महसूल विभाग आणि कृषी विभाग या शेतकऱ्याला कोणत्या प्रकारची मदत करते यावर सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे लक्ष लागून आहे




# स्टार प्रवाहवरील अबोली आणि अंकुशच्या आयुष्यात येणार नवा ट्विस्ट

## सुप्रसिद्ध अभिनेता माधव देवचकेची मालिकेत होणार एण्ट्री



स्टार प्रवाहवरील अबोली मालिकेचं कथानक अतिशय उत्कंठावर्धक वळणावर येऊन पोहोचलं आहे. अन्यायाविरोधात आवाज उठवत न्याय मिळवून देण्याचा अबोलीने घेतलेला वसा अनेकांसाठी आशेचा किरण ठरतोय. नवनव्या केसचा छडा लावत असतानाच आता अबोलीच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात नव्या पात्राची एण्ट्री होणार आहे. या नव्या पात्राचं नाव आहे श्रेयस सुमन मराठे. सुप्रसिद्ध अभिनेता माधव देवचके श्रेयस सुमन मराठे हे पात्र साकारणार आहे. अबोलीच्या विरोधात श्रेयस केस लढणार आहे. या नव्या आव्हानाचा अबोली आणि अंकुश कसा सामना करणार हे पहाणं उत्सुकतेचं असेल.सुप्रसिद्ध अभिनेता माधव देवचके जवळपास ६ वर्षांनंतर स्टार प्रवाहच्या मालिकेत दिसणार आहे. याआधी देवयानी आणि गोठ या मालिकेत माधवने लक्षवेधी भूमिका साकारली होती. श्रेयस सुमन मराठे ही व्यक्तिरेखा देखिल हटके असेल. श्रेयसचं आपल्या आईवर प्रचंड प्रेम होतं. त्यामुळे नावासोबतच तो आईचही नाव लावतो. अतिशय हुशार, यशस्वी आणि हवी असणारी गोष्ट मिळवण्यासाठी वाट्टेल ते करणारा श्रेयस अबोली-अंकुशच्या आयुष्यात नेमकी कोणती उलथापालथ घडवणार हे पहायचं असेल तर न चुकता पहा अबोली रात्री १०.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर. **स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

# अलगोंड-पाटील यांनी उभारला महाराष्ट्रातील सर्वात मोठा सॅन्ड क्रशर प्लान्ट

द.सोलापूर/प्रतिनिधीः वीस टक्के सिमेंटची बचत करणाऱ्या, नदीतील वाळूपेक्षा अधिक स्वस्त आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या कृत्रिम वाळूची निर्मिती करणाऱ्या तीस कोटी खर्चाच्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या सॅन्ड क्रशर प्लान्टचे तसेच देशातील सर्वात मोठ्या सॅन्ड वॉशिंग प्लान्टचे उद्घाटन रविवार, ९ जून रोजी सकाळी अकरा वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत दहिटणे (सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग हगलूर रस्ता) येथे पार पडणार असल्याची माहिती एआरपीआय ग्रुप ॲण्ड कंपनीचे प्रमुख तथा युवा उद्योजक राहुल परमानंद अलगोंड-पाटील व रोहन परमानंद अलगोंड-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. जुळे सोलापूर येथील त्यांच्या कार्यालयामध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उद्योजक परमानंद अलगोंड-पाटील, माजी सभापती इंदुमती अलगोंड-पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योजक राहुल अलगोंड-पाटील म्हणाले, नदीचा आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने बऱ्याच वर्षांपासून नदीतील वाळू उपसा बंद झाला आहे.

त्यामुळे अनेक बांधकामे रखडली होती. याचा थेट परिणाम या क्षेत्रातील मजुरांवर झाला होता. वाळू उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम खर्चात वाढ होत आहे. लहान-सहान व्यावसायिकांना वाळू उपलब्धतेसाठी धावाधाव करावी लागत आहे.

सामान्य माणूस अडचणीत आला असून घर बांधणीसाठी वाळू खरेदी करताना त्यांना दुप्पट पैसे मोजावे लागत आहेत. मागणी जास्त आणि उपलब्धता कमी यामुळे वाळूचे दर आवाक्याबाहेर पोहोचले आहेत. याला उत्तम पर्याय कृत्रिम वाळू हाच आहे. नदीतील वाळूमध्ये तीस टक्के माती असते त्यामुळे बांधकाम मजबूत होत नाही. मात्र, आमच्या प्रकल्पातील कृत्रिम वाळूमध्ये केवळ पाच टक्के माती असते त्यामुळे बांधकाम



हे अत्यंत मजबूत होते आणि दीर्घकाळ टिकते. या दोन्ही प्रकल्पासाठी तीस कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. सॅन्ड वॉशिंग प्लान्टमध्ये कृत्रिम वाळू ही डायमंड हिऱ्याच्या आकाराप्रमाणे अत्यंत स्वच्छ केली जाते. याचा फायदा बांधकामाच्या मजबुतीला होणार आहे. या दोन्ही प्रकल्पाचा फायदा सोलापूर जिल्ह्यासह लातूर, उस्मानाबाद, सातारा, पुणेसह कर्नाटक राज्याला होणार आहे. येथील बांधकामासाठी आमच्या प्लान्टमधील उत्पादनाची मागणी होत आहे. शहरांतील पूल, फ्लायओव्हर्स, काँक्रिट रस्ते, मोठमोठे बिल्डिंग प्रोजेक्ट, रेडिमिक्स फ्लॅट, प्रिस्ट्रेस्ड पाईप्स यांच्या निर्मितीत अनेक ठिकाणी कृत्रिम वाळूच पर्याय असणार आहे. सध्याची व भविष्याची गरज ओळखूनच आम्ही या दोन मोठ्या प्रकल्पाची उभारणी केल्याचे अलगोंड-पाटील यांनी सांगितले.

# धर्मादाय सहआयुक्तपदी रजनी क्षीरसागर यांची नियुक्ती

पुणे : येथील धर्मादाय सहआयुक्त सुधीर बुक्के यांची बदली झाली असून त्यांच जागी नगर दिवाणी न्यायालय व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मुंबईच्या रजनी किरण क्षीरसागर यांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने राज्यातील चार सहधर्मादाय आयुक्तांच्या तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने नियुक्त्या केल्या असून यात क्षीरसागर यांचा समावेश आहे.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ०१ लाख १८ हजार किंमतीचे सोने-चांदी वस्तू अर्पण



**पंढरपूर/प्रतिनिधीः** मौजे वसमत, (ता. हिंगोले) येथील भाविक कौशल्याबाई मूर्तीराम करळे यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस सोने १७ ग्रॅम (बोर मन्याची माळ, टॉप झुबे जोड व मंगळसूत्र) व चांदी २९८ ग्रॅम (कडे जोड) अशा सोने-चांदी वस्तू अर्पण केले आहेत. सोने-चांदी वस्तुची किंमत अनुक्रमे रू.९६०००/- व रू.२२०००/- इतकी आहे.यावेळी मंदिर समितीच्या वतीने श्रीमती करळे यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख श्री विनोद गिताराम पाटील यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, उपरणे व महावस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख ज्ञानेश्र्वर कुलकर्णी उपस्थित होते.

# मुरादपुर येथे शासकीय जमिनीवर अवैध वृक्षतोड

**बुलढाणा / राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मौजे मुरादपूर येथील ग्रा प ने शासकीय जमीनीवरील अवैध वृक्षतोड करण्यात आली व सदर ठिकाणी गावातीलच व्यक्ती साठी सदर वृक्षतोड करण्यात आली कि काय असा प्रश्र्न निर्माण झाला आहे कारण सदर वृक्षतोडी संदर्भात तक्रार दाखल केली आहे परंतु काहीच कारवाई नाही २/०६/२३ रोजी तक्रार दाखल केली आहे त्यानंतर सदर जागेवर अतिक्रमण होत असताना सदर ग्रा प १३/०३/२४ रोजी पुन्हा तक्रार दाखल केली परंतु सरपंच सचिव यांनी सदर अतिक्रमण धारक यांच्यावर कारवाई न करता सदर अतिक्रमण धारक याला सहकार्य केले व सचिव यांनी शासनाच्या जमीन बळकावणार्यांना सहकार्य करित आहे तरी या संबंधीची तक्रार तहसीलदार चिखली यांच्याकडे केली असता सदर तक्रारी ची दखल घेऊन पं स यांनी सदर अतिक्रमण धारक यांच्यावर कारवाई करावी अशे कळविले परंतु सदर विभागातील अधिकारी यांना सुध्दा शासणाच्या जमीनीची कोणतीही पर्वा नसल्यासारखे झाली आहे परंतु सदर अतिक्रमण धारक यांच्याकडे ग्रामपंचायत रेकॉर्ड नुसार स्वतः ची जागा असताना फक्त सरपंच सचिव यांच्या आशिर्वादाने सदर अतिक्रमण केले असुन सदर सरपंच सचिव हे आपल्या कर्तव्यात कसूर करीत असतांना त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित आहे परंतु आता सदर पं सं चे गटविकास अधिकारी साहेब सदर प्रकरणात काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे तरी सदर प्रकरण व अतिक्रमण धारक यांच्यावर कारवाई करण्यासाठी नियमानुसार ६महिण्याच्या आतिल अतिक्रमण ग्रामपंचायतला काढण्याचा अधिकार असताना सदर अतिक्रमण धारक याला सरपंच सचिव का पाठिशी घालत आहेत असा प्रश्र्न निर्माण झाला आहे तरी सदर अतिक्रमण धारक व सरपंच सचिव यांची चौकशी व्हावी व अतिक्रमण धारकावर कारवाई करुन शासणाची बळकावण्यात आलेली जागा मोकळी व्हावी जर कर्मचारी सचिव साहेब व सरपंच जर आपल्या पदाचा दुरुपयोग करत असतील तर त्यांच्यावर कारवाई व्हावी अशी तक्रार मुरादपुर ग्रा प चे उपसरपंच विष्णु महाराज गाडेकर यांनी पं सं गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे सदर अधिकारी काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे



## पंढरी तडका न्यूज चैनल चे उपसंपादक हेमंत यादव यांचे निधन

**पंढरपूर/प्रतिनिधी**



पंढरपूर शहरातील ज्येष्ठ पत्रकार संजय यादव यांचे चिरंजीव पंढरी तडकाचे उपसंपादक हेमंत यादव यांचे हृदयविकाराच्या झटक्याने तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्र्चात आई वडील चुलते आजी भाऊ पत्नी एक मुलगी असा परिवार आहे त्यांच्या जाण्याची संतपिट परिसरात हळहळ व्यक्त होत आहे हेमंत यादव हे एक ज्येष्ठ पत्रकार संजय यादव यांचा मुलगा पत्रकारांना ज्ञान देणारा व पत्रकारांना सामावून घेऊन त्याला संपूर्णपणे पत्रकारितेची माहिती देणारा असा संबंधस्य व मनमिळावू स्वभावाचा असणारा असा पत्रकार आपल्यातून हरपलेला आहे नेहमी हसत खेळत राहणारा हेमंत यादव व्हा अडचणीच्या काळात धावून येणारा असा पत्रकार हरपल्याने संत पेठ परिसरात समाजात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या केंद्रीय मंत्रीमंडळात तिसऱ्यांदा रिपब्लिकन नेते रामदास आठवले यांचा समावेश निश्चित

## मुंबई महाराष्ट्रातून तसेच देशभरातून शेकडो रिपब्लिकन कार्यकर्ते उत्साहात दिल्लीला रवाना

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए चे केंद्रात सरकार स्थापन होत असून उद्या रविवार दि.९ जून रोजी नरेंद्र मोदी प्रधानमंत्री पदाची हॅट्रिक साधणार आहेत. एन डी ए सरकार चे प्रमुख म्हणून नरेंद्र मोदी प्रधानमंत्री पदाची उद्या शपथ घेणार असून त्यांच्या समवेत राष्ट्रीय लोकशाही आघाडी ( एन डी ए ) चे घटक दलाच्या ही निवडक नेत्यांना मंत्रिपदाची शपथ देण्यात येणार आहे.एन डी ए चे घटक रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदास आठवले यांचा सुद्धा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश निश्र्चित झाला असून उद्या दि .९ जून रोजी ना.रामदास आठवले केंद्रीय मंत्री पदाची शपथ घेऊन केंद्रीयमंत्री म्हणून हॅटट्रिक करणार आहेत.

त्यामुळे देशभरातील रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून उद्या होणाऱ्या केंद्रीय मंत्री मंडळाच्या शपथ विधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी देशभरातील रिपब्लिकन कार्यकर्ते दिल्लीला रवाना झाले आहेत.यात मुंबईतील महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्ते आघाडीवर असून अनेक लोक दिल्लीत दाखल झाले असून उद्या रविवारी सुद्धा मोठ्या संख्येने रिपब्लिकन कार्यकर्ते दिल्लीला पोहोचत आहेत.



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांनी ५ जुलै २०१६ रोजी केंद्रीय प्रथमतः केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री पदाची शपथ घेतली होती.तेंव्हा देशभरात दलित बहुजन जनतेत आनंद उत्सव साजरा झाला होता.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर त्यांच्या रिपब्लिकन पक्षाचा नेता पहिला भीमसैनिक म्हणून ना. रामदास आठवले यांना केंद्रीय राज्य मंत्री पदाचा बहुमान लाभला होता.त्यानंतर २०१९ मध्ये केंद्रीयमंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा रामदास आठवले यांना संधी मिळाली होती.आता उद्या होणाऱ्या मोदी सरकार च्या तिसऱ्या टर्म मध्ये ना. रामदास आठवले यांचा केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा समावेश होणार आहे.मात्र केंद्रीय मंत्री मंडळात ना. रामदास आठवले यांना पुन्हा केंद्रीय राज्य मंत्री पद मिळणार का? की स्वतंत्र प्रभार चे मंत्रिपद मिळणार की केंद्रीय कॅबिनेट मंत्री म्हणून ना. रामदास आठवले यांना बहुमान मिळणार याकडे आंबेडकरी जनतेचे लक्ष लागले आहे.

देशभरातील दलित बहुजन रिपब्लिकन जनतेत रामदास आठवले यांच्या मंत्री पदाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. रामदास आठवले यांना यंदा केंद्रीय कॅबिनेट मंत्री पद मिळावे अशी देशभरातील कोट्यावधी दलित बहजन रिपब्लिकन जनतेची इच्छा आहे.

देशभरातील आंबेडकरी जनतेने ना. रामदास आठवले यांना केंद्रीय कॅबिनेट मंत्री व्हावेत म्हणून शुभेच्छा दिल्या आहेत.

## निर्जरा केअर फाउंडेशनतर्फे आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

सोलापूर/प्रतिनिधीः जागतिक पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिनानिमित्त निर्जरा केअर फाउंडेशनतर्फे १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षेतील करिअर यावर मान्यवरांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ८ जून रोजी सकाळी ११ वाजता आय.एम.ए. हॉल डफरिन चौक येथे करण्यात आल्याचे स्वाती साखरे-अळ्ळीमोरे यांनी सांगितले.

१२ वी नंतर विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअर निवडीसाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त असून याचे उद्घाटन पुण्यातील ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी हे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, निवृत्त सचिव चन्नवीर बिराजदार, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. प्रकाश घटोळे उपस्थित राहणार आहेत.

# मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी निवडणूक कामातून कार्यमुक्त

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी कर्मचारी यांच्या सेवा अधिग्रहीत केलेल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांना तातडीने कार्यमुक्त केले आहे. मा. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्या अनुषंगाने निवडणूक कामकाजाकरिता मुंबई महानगर पालिकेतील अत्यावश्यक, आपत्कालीन विभाग सोडून उर्वरित विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा निवडणुकीच्या कामाकरिता देण्याबाबत यापूर्वीच विनंती केली होती. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनातील प्रमुख अभियंता, पर्जन्य जलवाहिन्या, पाणीपुरवठा प्रकल्प, मलनिःस्सारण प्रचालन आणि प्रकल्प, रस्ते आणि वाहतूक अशा विभागांतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा निवडणूक कामाकरिता अधिग्रहीत केल्या नाहीत.

मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचाऱ्यांची निवडणूक कामातून सुटका नाही. त्यामुळे विविध पावसाळी कामांवर परिणाम होण्याची शक्यता अशा वारंवार वृत्तपत्रातून प्रसारित होणाऱ्या बातम्यांमुळे लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होऊन आरोग्य विषयक भीती निर्माण होऊ नये, म्हणून याबाबत मुंबई शहर जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून खुलासा करण्यात आला आहे.मुंबई शहरातील मतदान २० मे २०२४ रोजी पार पडले. मतदान प्रक्रियेत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांना दुसऱ्या दिवशी तातडीने कार्यमुक्त करण्यात आले.मतमोजणी प्रक्रिया दि. ४ जून रोजी पूर्ण झाली.त्यानंतर उर्वरित विधानसभा मतदारसंघ कार्यालया अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित केलेल्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करून कार्यालयात अहवाल सादर करावा. असे आदेश जिल्हाधिकारी संजय यादव यांनी काढले होते.

त्यानुसार अहवाल ही प्राप्त झाले आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालय निवडणूक शाखा आणि मनुष्यबळ व्यवस्था मुंबई शहर यांनी कळविले आहे. तसेच मा. भारत निवडणूक आयोगाने शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या कार्यक्रम घोषित केला असून सदर निवडणूक दि.२६ जून २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. या कामासाठी काही अंशी अत्यंत कमी कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत आहेत. ते पूर्ण वेळ नाहीत. आपल्या मूळ कार्यालयाचे कामकाज सांभाळून आठवड्यातील फक्त दोन दिवस काही वेळ निवडणूक कामकाजावर आहेत. यामध्ये आपत्कालीन आणि अत्यावश्यक सेवा सोडून इतर विभागाचा समावेश आहे.

# विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांशिवाय पर्याय नाही : गोकूळ मवार यांचे प्रतिपादन

**सोलापूर/प्रतिनिधीः**

शालेय जीवनातील राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, इंजिनीअरिंग, वैद्यकीय, आयआयटी मॅनेजमेंट क्षेत्रांतील पदवीसाठी प्रवेश मिळवण्यासाठी स्पर्धा परीक्षा द्याव्याच लागतात. तसेच शासकीय नोकरीसाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांशिवाय पर्याय नाही.

त्याकरिता विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, असे प्रतिपादन निवृत्त जिल्हाधिकारी गोकूळ मवारे यांनी केले. महादेव रुपनुरे प्रतिष्ठानतर्फे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त इयत्ता दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थी व उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या गुणगौरव समारंभात ते बोलत होते. हा गुणगौरव समारंभ रेणुकाचार्य मठ बंकलगी (ता. द. सोलापूर) येथे पार पडला. या कार्यक्रमात मुंबईच्या उद्योजिका सुवर्णा झाडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा जात पडताळणी अधिकारी सचिन कवले यांनी जातीचे दाखले पडताळणीसाठी येणाऱ्या समस्या-उपाय बाबत चर्चा केली. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विभाग कार्यवाहक शिक्षक आश्लेषा कारंडे, प्राचार्य एस. के. गायकवाड, प्रा. चंद्रशेखर उंब्रजकर, प्रा. शिवानंद घोंगडे उपस्थित होते. दामिनी पथकातील मंगल बांबळे, कविता कुंभार, समीना शेख, सुकन्या बनसोडे, कोळी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मंगरुळे यांनी केले. या कार्यक्रमास योगेश्री मवारे, वैशाली उबाळे, विकास गुन्नोर, तलाठी सुरेश कोळी, उमेश कोळी, औदुंबर बंडगर, सुरेश अर्जुने, पिरोजी शिंगाडे, शंकरराव जगताप, काशीनाथ कोणदे, अशोक सोनटकले, व्हरगर गुरुजी, शिवाजी जाधव, मल्लिकार्जुन धुळखेडे, उपसंरपच नागम्मा कोणदे, अशोक कोणदे, महेश वडगावकर, सरपंच चंद्रशेखर सगरे आदी उपस्थित होते. आभार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धोंडप्पा रुपनुरे यांनी मानले.





# शिवभक्तांनी रायगडावर खेळला लेझीमचा डाव

सोलापूर/प्रतिनिधीः हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून रायगडावर सोलापूरच्या १११ शिवभक्तांनी लेझीमचा बहारदार डाव सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. जुळे सोलापुरातील छत्रपती ग्रुप बहुउद्देशीय सामाजिक संघटनेचे उदयराज दत्तात्रय ताकमोगे यांच्या संकल्पनेतून प्रथमच रायगड किल्ल्यावर लेझीमच्या मर्दानी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यात जवळपास शंभरहून अधिक शिवभक्तांनी सहभाग नोंदवला. खरे तर शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध मंडळे प्रात्यक्षिके सादर करतात. यात लेझीमचा मर्दानी खेळ सादर करण्याची संधी सोलापूरच्या युवकांना मिळाली.

ही संधी न दवडता विविध संघटनांतील विविध जाती धर्मातील युवकांनी एकत्र मिळून लेझीमचा बहारदार खेळ सादर करून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यात प्रामुख्याने छत्रपती ग्रुप बहुउद्देशीय सामाजिक संघटना, शिवप्रताप तरुण मंडळ (मजरेवाडी), आय्या गणपतीवडार समाज (बाळीवेस) व दत्त-तारा ग्रुप (मजरेवाडी) यांचा समावेश होता. संकल्पना पार पाडण्यासाठी स्वप्निल शिंदे, मरुर भांडेकर, मुकुंद शिंदे, महेश पाटील, वैभव ताकमोगे, विठ्ठल शिंदे, युवराज ताकमोगे व मनोज विटकर या शिवभक्तांची मोलाची साथ लाभली.